D:\N.A New\NA New 2019\Juchandra 332.6.A.docx

# तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी वसई यांचे कार्यालय

## (महसूल शाखा)

किल्लाबंदर रोड, मालोंडे-वसई गाव, ता.वसई, जि.पालघर, पिन ४०१२०१.
दुरध्वनी क्र. (०२५०) २३२२००७

---

क्र.महसूल/क १/टे १/जमिनबाब/कावि — /एसआर ५२४/२०१९ दिनांक २० /०९/२०१९

प्रति,

मे.नवकार टाऊनशिप प्रा.लि.चे संचालक
चांदमल भवरलाल जैन मे.नवकार टाऊनशिप
प्रा.लि.चे संचालक लक्ष्मण भिकाजी खेडकर
सचिन आत्माराम वर्तक
चांदमल भरवलाल जैन
रा.नवकार सिटी नायगाव पुर्व ता.वसई जि.पालघर

विषय :- जमिनीचे बिनशेती व रुपांतरण कर भरुन घेणेबाबत.

| गावाचे नाव | स.नं/हि.नं | क्षेत्र (हे.आर) | पोट खराबा | एकुण क्षेत्र (हे.आर) | पैकी परवानगी मागितलेले क्षेत्र |
|---|---|---|---|---|---|
| जुचंद्र | ३३२/६/अ | ०.०५.९ | ०.०५.१ | ०.११.० | ०.११.० |
| | ३३६/२ | ०.८३.९ | ०.०३.९ | ०.८७.८ | ०.८७.८ |
| | ३३५/२ | ०.४५.५ | ०.००.० | ०.४५.५ | ०.४५.५ |
| | | | एकुण | १.४४.३ | १.४४.३ |

संदर्भ :- १.महाराष्ट्र शासन राजपत्र भाग चार क्रमांक ३ दिनांक ०५/०१/२०१७
मधील अध्यादेश क्रमांक २/२०१७
२.मा.जिल्हाधिकारी पालघर यांचेकडील पत्र
क्र.महसुल/क.१/टे.१/एनएपी/कावि-४३५/२०१७
दिनांक २१/०६/२०१७
३. मा.जिल्हाधिकारी पालघर यांचेकडील पत्र
क्र.महसुल/क.१/टे.१/४२ब/कावि.१३७०/२०१८
दिनांक १४/१२/२०१८

महाशय,

आपण या कार्यालयात अर्ज दाखल करुन विषयात नमुद जमिनीस रहिवास व वाणिज्य कारणासाठी बिनशेती व रुपांतरण कर भरुन मिळणेबाबत विनंती केली आहे.

प्रकरणातील कागदपत्रे तपासता, उक्त जमिन मिळकत ही वसई विरार शहर महानगरपालिका यांनी अभिप्राय कळविलेनुसार तसेच मा.जिल्हाधिकारी कार्यालय पालघर यांचेकडील संदर्भिय पत्र क्र. ३ मध्ये नमुद असलेनुसार उक्त जमिन वसई विरार शहर महानगरालिकेच्या विकास आराखडयात समाविष्ट असल्याची दिसून येते.

महाराष्ट्र शासन राजपत्र, भाग चार, क्रमांक ३ दिनांक ०५/०१/२०१७ मधील अध्यादेश क्रमांक २/२०१७ मध्ये महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम १९६६ चे कलम ४२ ब मध्ये विषद केलेल्या तरतुदीनुसार मंजुर व प्रारुप आराखडयात समाविष्ट असलेल्या जमिनीसाठी कलम ४७अ अन्वये रुपांतरण कर व अकृषिक आकारणी निश्चित करणेची आहे. त्यानुसार उक्त जमिन मिळकतीसाठी आपण खाली नमुद केलेप्रमाणे रुपांतरण कर व बिनशेती आकारणी रक्कम शासनजमा करावयाची आहे.

D:\N.A New\NA New 2019\Juchandra 332.6.A.docx

तसेच आपले विनंती अर्जानुसार आपणाकडुन महाराष्ट्र जमिन महसुल अधिनियम १९६६ चे कलम ४२ ब मधील तरतुदीनुसार केवळ रुपांतरण कर व बिनशेती आकारणीची रक्कम वसुल करणेत येत आहे. त्यामुळे आपणास जागेवर नियोजीत अकृषिक वापर करावयाचा असल्यास त्यापुर्वी संबंधित नियोजन प्राधिकरणाची व इतर आवश्यक त्या प्राधिकरणांची पुर्वपरवानगी घेणे बंधनकारक राहील.

| गावाचे नाव | स.नं/ हि.नं | एकुण क्षेत्र (चौ.मी) | | गावचा बिनशेती दर रु.पै | | बिनशेती आकारणीचे स्वरुप (३ पट) | | बिनशेती आकारणी रु.रु | | कलम ४७ अ अन्वये रुपांतरीत कर आकारणी स्वरुप (५ पट) | | रुपांतरीत कर रु.रु |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| जुचंद्र | विषयात नमुद स.नं/हि.नं | १४४३०.०० | X | ०.१० | X | ३ | = | ४३२९/- | X | ५ | = | २१६४५/- |

सदरची बिनशेती आकारणी व रुपांतरीत कर शासनजमा केलेली चलने तलाठी जुचंद्र यांचेकडे जमा करण्यात यावीत.

मंजुर टिप्पणीनुसार

तहसिलदार, वसई
TAHSILDAR, VASAI

तहसिलदार वसई

प्रतः- तलाठी जुचंद्र

२/- वर नमुद केलेल्या जमिन मिळकतीबाबत अर्जदार/जमिनमालक यांनी शासनजमा केलेली चलने तपासुन महाराष्ट्र शासन राजपत्र, भाग चार, क्रमांक ३ दिनांक ०५/०१/२०१७ मधील अध्यादेश क्रमांक २/२०१७ मध्ये नमूद केलेल्या तरतुदीनुसार अधिकार अभिलेखात कार्यवाही करावी.

तहसिलदार वसई